Gaavmat

www.gaavmat.in

# गावमत

To,

If undeliverd, please return to

WEEKLY GAAVMAT
Office : Near Police Station Badnapur
Tq.Badnapur Dist Jalna -431202 (Maharastra)
Contact Us: 9923307786,9421947786

Jalna ❍Volum No 12 ❍Issu No 15 ❍Monday, Date 20.01.2025 To 26.01.2025 ❍Marathi- Weekly ❍Price 2 Rs. ❍Page 4

# बदनापूर तालुक्यात पुन्हा अवैध धंद्याना ऊत

## जुगार, चक्री, मटका, वेश्या व्यवसाय राजरोसपने सुरु पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर वाळू माफियांकडून वाळु साठा

प्रतिनिधी बदनापूर

बदनापूर तालुक्यात पुन्हा अवैध धंद्याना ऊत आला असून जुगार, चक्री, मटका, वेश्या व्यवसाय राजरोसपने सुरु आहे तर पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर वाळू माफियांकडून मागील अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू साठा करून पुरवठा करण्यात येत आहे. मात्र, वाळू माफियांच्या अवैध वाहतूक वाळू साठ्यांकडे महसूल विभागासह पोलीस दुर्लक्ष करत असल्यामुळे बदनापूर तालुक्यात परिसरात राजरोसपणे मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू आहे. उल्लेखनीय बाब अशी की, वाळू उपसा करून वाहतूक करणा?्या टॅक्टर धारकांकडून पोलीस व महसुल प्रशासनाला दर महा ठराविक रक्कम दिली जात असून केवळ देखावा म्हणून तीन दिवस वाळू वाहतूक बंद करण्यात आली होती व हप्त्याची रक्कम वाढवून शनिवार पासून पुन्हा जैसे थे परिस्थिती झाली असून बदनापूर ,अकोला ,मांजरगाव दुधना नदीच्या पात्रातुन वाळू उपसा करून विक्री केली जात आहे मात्र पोलिस प्रशासन, महसूल विभागाच्या 'हितसंबंधामुळे' हा सर्व प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून राजरोसपणे सुरू असल्याची तक्रार परिसरातील नागरिकांनी माध्यमांकडे केली आहे.विशेष म्हणजे आमदार कुचे यांनी अवैध धंदे बंद करण्याची सूचना पोलिसांना दिली असतांना तीनच दिवसात अवैध धंदे पुन्हा मोठ्या जोमाने सुरु झाले.तरी आमदार नारायण कुचे आता गप्प का असा प्रशन उपस्थित होत आहे, याविषयीं जोरदार चर्चा होत आहे.

शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून चोरट्या मार्गाने वाळू वाहतूक वाळू साठ्याचा गोरखधंदा बदनापूर परिसरात सध्या फोफावताना दिसत आहे. बदनापूर ,अकोला ,मांजरगाव,कुंभारी,कडेगाव,वरुडी आदी ठिकाणाहून दररोज अवैधरीत्या वाळूची मोठ्या प्रमाणावर राजरोस चोरटी वाहतूक करण्यात येत आहे.

या चोरट्या वाहतुकीकडे संबंधित महसूल विभाग, वाहतूक स्थानिक पोलिस प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे माफियांचे फावत आहे. परिणामी शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडवून नुकसान होत आहे.

याच अवैध वाहनांच्या सुसाट वेगामुळे अनेकांना आपले प्राणही गमावावे लागले आहेत.विशेष म्हणजे मागील वर्षी वाळू माफियांनी पोलिसांवर देखील हल्ला केल्याच्या घटना घडलेल्या आहेत, विनाक्रमांक धावणा?्या हायवा ट्रकमधून ही चोरटी वाळू वाहतूक सुरू आहे.

माफियांच्या वाढत्या दहशतीमुळे तसेच प्रशासकीय अधिकारी-कर्मचा?्यांच्या 'मधुर संबंधामुळे' सर्वकाही सुरळीत सुरू असल्याची खंत परिसरातील नागरिकांतून व्यक्त होत आहे.सोबतच चक्री जुगार, मटका व इतर अवैध धंदे पुन्हा जोरात सुरु झाल्याने आमदार नारायण कुचे गप्प का बसले अशी चर्चा होत असल्याने प्रशन उपस्थित होत आहे.

## रात्रीस खेळ चाले..... :

सध्यावाळूपट्ट्यांचे लिलाव लालफितीत अडकल्यामुळे मागणीच्या तुलनेत वाळू उपलब्ध होत नाही. परिणामी वाळूचे भाव वाढले आहेत. याच संधीचा फायदा घेत वाळू माफिया प्रशासकीय कर्मचारी-अधिकारी तसेच पुढा?्यांना हाताशी धरून वाळू साठा करत मागणीनुसार वाळू विक्रीचा गोरखधंदा करत आहेत. त्यासाठी या माफियांनी रात्रीची वेळ निवडली आहे. रात्री उशिराने सुरू होणारा हा प्रवास पहाटेपर्यंत चालतो. नागरिकांनी या प्रकरणाला वाचा फोडण्यासाठी माध्यमांकडे धाव घेऊन हे प्रकरण प्रकाशझोतात घेऊन येण्यासाठी पुढाकार घेतला. मात्र, माफियांचा पोलिस प्रशासनाचा ससेमिरा नको म्हणून त्यांनी नाव छापण्यास असमर्थता दाखवली. परिसरातील अनेक नागरिकांच्या मोबाइलमध्ये अवैध वाळू माफियांच्या गोरखधंद्याचे चित्रीकरण छायाचित्रे उपलब्ध असल्याचे नागरिक सांगतात.

## आमदार नारायण कुचेच्या सूचनांना बगल

बदनापूर अंबड विधानसभा मतदार संघाचे आमदार नारायण कुचे यांनी मागील आठवड्यात बदनापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांना बदनापूर शहरासह तालुक्यातील अवैध वाळू उपसा ,जुगार ,मटका ,वेश्या व्यवसाय ,गुटखा आदी इतर अवैध धंदे तात्काळ बंद करण्याची सूचना दिलेली असतांना केवळ देखावा म्हणून तीन दिवस अवैध धंदे बंद करण्यात आले होते मात्र शनिवार पासून पुन्हा मोठ्या जोमाने सदरील धंदे राजरोसपणे सुरु झाले आहे ,विशेष म्हणजे मागील आठवड्यात सोशल मीडियावर बदनापूर पोलीस ठाण्यात कोणत्या धंदेवाल्याकडून किती रक्कम दरमहा घेतली जाते याची यादीच व्हायरल झाल्याने खमंग चर्चा सुरु झालेली असतांना पुन्हा धंदे जोरात सुरु झाले मात्र जिल्हा पोलीस अधीक्षकांनी कोणतेही दखल घेतली नसल्याचे दिसून येते .सदर यादी कोणाच्या हस्ताक्षरात आहे ,कोणत्या पोलीस कर्मचा?याने यादी बनवली याचा तपास करून सत्य जनतेसमोर आणणे गरजेचे आहे ,सदर रद्दीत आगस्ट 2024 या महिण्यात किती रक्कम जमा झाली याची सविस्तर माहिती आहे. अवैध धंदे जोरात सुरु झालेले असतांना आमदार नारायण कुचे काहीच बोलायला तय्यार नसल्याचे चित्र दिसत असून आमदाराच्या आदेशाला पोलिसांनी गांभीर्याने घेतलेले नसतांना देखील आमदार शांत कसे? असा प्रशन जनतेतून उपस्थित होत आहे, केवळ पोलिसांचे हप्ते वाढविण्यासाठी नाटक करण्यात आले कि काय अशी चर्चा जनतेत होत आहे.

### माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या पाठपुराव्यास यश!

# कुंभमेळयासाठी मराठवाड्यातील भाविकांना विशेष रेल्वेची सुविधा

जालना ( प्रतिनिधी) ः बारा वर्षांनी येणा?्या हिंदू धर्मातील पवित्र महाकुंभ पर्वासाठी जाण्याकरिता मराठवाड्यातील भाविकांना विशेष रेल्वे उपलब्ध करावी अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनीकुमार वैष्णव यांच्याकडे केली होती. त्या अनुषंगाने रेल्वेमंत्री अश्विनीकुमार यांनी विशेष रेल्वे गाड्यांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

प्रयागराज ( उत्तर प्रदेश )येथील कुंभ मेळाव्यात जाण्याकरीता नांदेड-पटणा-नांदेड, औरंगाबाद-पटणा-औरंगाबाद , काचीगुड-पटणा-काचीगुडा आणि सिकंदराबाद-पटणा-सिकंदराबाद विशेष रेल्वे प्रयागराज छिवकी मार्गे चालविण्यात येत आहेत. यात

गाडी क्रमांक 07721 नांदेड ते पटणा ही विशेष गाडी नांदेड येथून दिनांक 22 जानेवारी 2025 रोजी रात्री 11.00 वाजता सुटेल पूर्णा, वसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, जबलपूर, इटारसी, पिपरिया, जबलपूर, काटणी, संटणा, माणिकपूर, प्रयागराज चौकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बकसर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिस?्या दिवशी सकाळी 10.30 वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक 07722 पटणा ते नांदेड विशेष गाडी पटणा येथून दिनांक 24 जानेवारी 2025 रोजी दुपारी 03.30 वा. सुटेल आणि आलेल्या मार्गानेच नांदेड येथे दिनांक 26 जानेवारी रोजी सकाळी 04.30 वाजता पोहोचेल. या गाडीत 22 डब्बे असतील. गाडी क्रमांक 07725 काचीगुडा ते पटणा मार्गे नांदेड ही विशेष गाडी काचीगुडा येथून दिनांक 25 जानेवारी 2025 रोजी दुपारी 04ः45 वाजता सुटेल आणि निजामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, जबलपूर, इटारसी, पिपरिया, जबलपूर, काटणी, संटणा, माणिकपूर, प्रयागराज चौकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बकसर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिस?्या दिवशी सकाळी 10.30 वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक 07726 पटणा ते काचीगुडा मार्गे नांदेड ही विशेष गाडी पटणा येथून दिनांक 27 जानेवारी 2025 रोजी सकाळी 11ः30 वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच काचीगुडा येथे सकाळी 07ः00 वा.पोहोचेल.

गाडी क्रमांक 07099 नांदेड ते पटणा ही विशेष गाडी नांदेड येथून दिनांक 13 फेब्रुवारी 2025 रोजी रात्री 11.00 वाजता सुटेल आणि पूर्णा, वसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर,जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिस?्या दिवशी सकाळी 10.30 वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक 07100 पटणा ते नांदेड विशेष गाडी पटणा येथून दिनांक 15 फेब्रुवारी 2025 रोजी दुपारी 03.30 वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच नांदेड येथे दिनांक 17 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 04.30 वाजता पोहोचेल. या गाडीत 22 डब्बे असतील.

गाडी क्रमांक 07101 औरंगाबाद- पटणा ही विशेष गाडी औरंगाबाद येथून दिनांक 19 फेब्रुवारी 2025 आणि 25 फेब्रुवारी 2025 रोजी संध्याकाळी 07.00 वा. सुटेल आणि जालना, सेलू ,परभणी,पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर,जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिस?्या दिवशी सकाळी 10.30 वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक 07102 पटणा ते औरंगाबाद विशेष गाडी पटणा येथून दिनांक 21 फेब्रुवारी 2025 आणि 27 फेब्रुवारी 2025 रोजी दुपारी 03.30 वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच औरंगाबाद येथे अनुक्रमे दिनांक 23 फेब्रुवारी 2025 आणि दिनांक 29 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 07.45 वाजता पोहोचेल. या गाडीत 22 डब्बे असतील.

गाडी क्रमांक 07103 काचीगुडा ते पटणा मार्गे नांदेड ही विशेष गाडी काचीगुडा येथून दिनांक 22 फेब्रुवारी 2025 रोजी दुपारी 04ः45 वाजता सुटेल आणि निजामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, वसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिस?्या दिवशी सकाळी 10.30 वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक 07104 पटणा ते काचीगुडा मार्गे नांदेड ही विशेष गाडी पटणा येथून दिनांक 24 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 11ः30 वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच काचीगुडा येथे दिनांक 26 फेब्रुवारी 2025 सकाळी 07ः00 वाजता पोहोचेल. या गाडीत 22 डब्बे असतील.

गाडी क्रमांक 07105 सिकंदराबाद ते पटणा मार्गे नांदेड ही विशेष गाडी सिकंदराबाद येथून दिनांक 07 फेब्रुवारी 2025 रोजी संध्याकाळी 05.00 वाजता सुटेल आणि निजामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, वसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर,खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिस?्या दिवशी सकाळी 10.30 वाजता पोहोचेल.गाडी क्रमांक 07106 पटणा ते सिकंदराबाद मार्गे नांदेड ही विशेष गाडी पटणा येथून दिनांक 09 फेब्रुवारी 2025 रोजी दुपारी 03ः30 वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच सिकंदराबाद येथे दिनांक 11 फेब्रुवारी 2025 सकाळी 11ः30 वाजता पोहोचेल. या गाडीत 20 डब्बे असतील. असे सांगून भाविकांनी मोठ्या संख्येने या सेवेचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन रावसाहेब पाटील दानवे यांनी केले आहे.

### आरक्षण सुविधेने प्रवास सुखकर होईलः भास्करराव दानवे

प्रयागराज येथे महाकुंभ पर्वात कोट्यावधी हिंदू भाविकांना गैरसोय होऊ नये यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, आणि उत्तर प्रदेश चे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली केंद्र आणि राज्य शासनाने काटेकोर नियोजन केले असून देशाच्या विविध भागातील भाविकांना प्रयागराज येथे पोहोचण्यासाठी विशेष रेल्वे गाड्या सोडल्या जात आहेत. मराठवाड्यातील भाविकांना दि. 22 जानेवारी ते 22 फेब्रुवारी 2025 या कालावधीत रेल्वे गाड्या टप्प्या- टप्प्याने जाणार आहेत. प्रवासात अडचणी येऊ नये यासाठी रेल्वे विभागातर्फे आगाऊ आरक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे भाविकांचा प्रवास सुखकर होईल. असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे यांनी व्यक्त केला. तथापि भाविकांनी नियोजन करून सर्व सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन भास्करराव पाटील दानवे, रेल्वेचे विभागीय सल्लागार अर्जुन गेही, जालना स्थानक सल्लागार समितीचे प्रा. राजेंद्र भोसले, ममता कोंड्याल, शिवराज जाधव, बाबुराव भवर यांनी केले आहे.

# सुसंस्कृतपणा लयाला जातो हे भयंकर!

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषकांचे स्वपन अधिकृतपणे पूर्ण झाले. वास्तविक हे स्वपन 4 ऑक्टोबर 2024 रोजीच पूर्ण झाल्याचे उघड होत आहे. केंद्राच्या सांस्कृतिक मंत्रालयाने 3 ऑक्टोबर रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर दुस-याच दिवशी म्हणजे 4 ऑक्टोबर 2024 रोजी त्या संदर्भातील अधिसूचनाही काढली. त्यामुळे मराठी भाषेला अधिकृतपणे अभिजात भाषेचा दर्जा तीन महिन्यांपूर्वीच मिळाला. परंतु विधानसभा निवडणूक आणि त्यानंतर सत्तेसाठीची साठमारी यामुळे आपल्यालाच तो प्राप्त करून घेण्यास उशीर झाला हे उघड आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा अध्यादेश बुधवारी नवी दिल्लीत जारी करण्यात आला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देत असल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गतवर्षी केली होती. ही घोषणा झाली असली तरी त्याबाबतचा अध्यादेश निघाला नव्हता. शिवसेनेचे (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी गेल्या आठवड्यात हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर बुधवारी राज्याचे उदयोगमंत्री उदय सामंत यांनी नवी दिल्लीत हा अध्यादेश प्राप्त झाल्याची माहिती प्रसारमाध्यमांना दिली.देशातील कोणत्याही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी काही निकष पूर्ण करावे लागतात. ती भाषा किमान दीड ते दोन हजार वर्षे प्राचीन असावी लागते. त्या भाषेत समृद्ध ग्रंथ व साहित्य परंपरा असणे आवश्यक असते. हे साहित्य मूळ भाषेत लिहिलेले असावे, भाषेचा प्रवास अखंडित असावा त्याचप्रमाणे प्राचीन व वर्तमान भाषेतील नाते सुस्पष्ट असावे अशा अटी आहेत. अमळनेर येथे झालेल्या 97 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठीचा ठराव मांडण्यात आला. त्यानंतर एक समिती स्थापन करण्यात आली. प्रा. रंगनाथ पाठारे यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत सरहद्द संस्थेचे अध्यक्ष संजय नहार, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांचा समावेश होता.या समितीने 31 मे 2013 रोजी केंद्र सरकारकडे आपला अंतिम अहवाल सुपुर्द केला. ज्ञानेश्वर मुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक पाठपुरावा समितीही तयार करण्यात आली होती. तब्बल दहा वर्षांनंतर गतवर्षी विधानसभा निवडणुकीच्या आधी केंद्र सरकारने मराठीला अभिजात दर्जा देण्याची घोषणा केली. परंतु नंतर काहीच हालचाल न दिसल्याने विरोधक हा निवडणुकीचा जुमला होता काय अशी टीका करू लागले. 3 ऑक्टोबर 2024 रोजी मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची घोषणा झाली होती. मात्र तीन महिने उलटूनही शासन आदेश जारी न झाल्याने निणऱ्यावर प्रशनचिन्ह निर्माण झाले होते. केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्या हस्ते उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे अभिजात दर्जाबाबतचा शासन आदेश सुपुर्द करण्यात आला. त्यामुळे आता मराठी भाषा ही अधिकृतपणे अभिजात भाषा ठरली आहे.अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर जे काही लाभ मिळतात, ते मिळवण्यासाठी आम्ही तातडीने प्रस्ताव सादर करणार आहोत असे सामंत म्हणाले. त्यांनी महाराष्ट्रातील जनतेच्या वतीने तसेच मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या वतीने पंतप्रधान मोदी व केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांचे आभार मानले. मराठी भाषेतील काम साहित्यिकांना विश्वासात घेऊन केले जाईल. दिल्ली आणि अन्य भागात मराठी शाळा आहेत. त्या शाळा सक्षम करण्याचा आमचा प्रयतन राहील. मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयतन केले जातील असे उदय सामंत यांनी म्हटले आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाचे औपचारिक आभार मानण्यासाठी खरे तर सामंत यांनी शेखावत यांची भेट घेतली होती. त्याच औपचारिकतेतून शेखावत यांनी बुधवारी अधिसूचनेची प्रत सामंत यांच्याकडे सुपुर्द केली. पुण्यामध्ये 31 जानेवारी, 1 व 2 फेब्रुवारी असे तीन दिवस विश्व मराठी साहित्य संमेलन होत आहे. या संमेलनाच्या उद्घाटनाला केंद्रीय मंत्री शेखावत उपस्थित राहणार आहेत. तर राजधानी दिल्लीमध्ये 21 ते 23 फेब्रुवारी या काळात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत असून त्यासाठी 2 कोटींचा निधी उपलब्ध करून दिला जाईल अशी माहिती उदय सामंत यांनी दिली.केंद्रीय अधिसूचना काढल्यामुळे अभिजात भाषेच्या संवर्धनासाठी केंद्राचे आर्थिक सा मराठी भाषेलाही मिळेल. अभिजात भाषांच्या संवर्धनासाठी केंद्र सरकार दरवर्षी 250 ते 300 कोटी रुपयांचे अनुदान देते. त्यातील निधीचा उपयोग मराठी ग्रंथ व साहित्याचा प्रचार, ग्रंथालये उभारणी, मराठी भाषेच्या प्रचारासाठी भाषा भवनाची उभारणी आदी विविध कामांसाठी करता येऊ शकतो. नव्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात मराठी हा विषय 'पर्यायी' केल्याची चर्चा सुरू असताना शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी 'मराठी अनिवार्यच' अशी स्वागतार्ह भूमिका घेतली आहे. राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनांच्या तसेच बोर्डाच्या शाळांमध्ये मराठी शिकवणे बंधनकारक असून, शाळांना कोणतीही पळवाट काढता येणार नाही अशी स्पष्ट ताकीद मंत्री भुसे यांनी दिली आहे.राज्यातील शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णैय झाला असला तरी सीबीएसई, आयसीएसई, केंद्रीय शाळांमध्ये या निणऱ्याची अंमलबजावणी करण्यात चालढकल केली जाते याकडे लक्ष द्यावे लागेल. इंग्रजी भाषा आवश्यक असली तरी राज्यात मराठीचे महत्त्व सर्वांत जास्त आहे. इंग्रजी भाषेत शिकणारी मुले घरात मराठीत बोलतात पण त्यांचे मराठीचे अज्ञान लपवता येत नाही. या मुलांना मराठी संस्कृतीचे भान राहत नाही. आई-बाबा विसरून मम्मी-डॅडीचे फॅड अंगवळणी पडताना दिसते, घरातला सुसंस्कृतपणा लयाला जातो हे भयंकर आहे.

# जात नष्ट करणे आहे?

जात अस्तित्वात आली कामावरुन. कामाची आखणी केली गेली व त्या कामानुसार कामाचं वर्गीकरण झालं. त्यातच विशिष्ट कामाची माणसं लवकर ओळखायला यावीत. म्हणून जात निर्माण झाली. ज्यात सुरुवातीला जातीजातीतील भेदभाव नव्हता. ज्यात विटाळही नव्हता. परंतु कालांतरानं त्यात विटाळ व भेदभाव शिरला. ज्यातून सामान्य माणसांचे जीवन जगणे असह्य झाले होते. हे सर्व स्वार्थापायी झालं होतं. विशिष्ट वर्गानं आपली अक्कलहुशारी वापरुन आपल्या बिरादरीला सुख भोगता यावं म्हणून निर्माण झालेल्या जातीचा वापर कलुषीतता निर्माण करण्यासाठी केला. आजही करीत आहे. म्हणूनच जात नष्ट करणे आहे.ङ

जात स्वार्थासाठी निर्माण केलेली गोष्ट. काल जातीचं महत्व होतं. लोकांना जात व जातीची माणसं ओळखू यावी म्हणून. ज्या जातीनं पुढं जावून व्यक्तीत विटाळ व भेदभाव निर्माण केला. ज्यातून विशिष्ट जातीवर अत्याचार झाले. जे असह्य अशाच स्वरुपाचे होते. जातीवर आधारीत विटाळ कालपर्यंत चालला. आजही आहे. म्हणूनच जात नष्ट करणे आहे.

जात...... जी जात नाही, ती जात. जातीवरुन विटाळ अस्तित्वात आला. विटाळ हा स्वच्छतेवरुन अस्तित्वात आला. काही लोकं म्हणतात की पुर्वी जातीवरुन विटाळ नव्हता तर तो विटाळ म्हणजे काही काळाकरिता लोकांना दिलेली शिक्षा होती. जातीवरुन विटाळ जर असता तर कुंभार, सुतार वा इतर तत्सम कामे करणा?यां लोकांच्या बाबतीतही विटाळ असता. परंतु तो नाही. याचाच अर्थ जातीवरुन विटाळ नव्हताच. विटाळ होता कामावरुन. लोकांना वाटत होतं की ती कामं अर्थात घाणेरडी कामं कोणीही करु नये. ती सोडावीत. म्हणून विटाळ नावाची शिक्षा. ती शिक्षा होती लोकांनी सुधरावं यासाठी. त्यांनी व्यवस्थीत राहावं. घाणेरडं राहू नये यासाठी दिलेली. त्यांचं म्हणणं होतं की लोकांनी घाणेरडं काम करु नये. स्वच्छ अंघोळ करावी व नीटनेटकं राहावं. कारण असं अस्वच्छ राहण्यातून लोकांना आजार शिवतो. साथीचे रोग पसरतात. कारण पुर्वी गावात साथीच्या साथी यायच्या. ज्या साथीत कित्येक लोकं मरण पावत असत. ती आजाराची साथ अस्वच्छतेपासून पसरत असल्यानं ती अस्वच्छतेची कामं करणा?यांचा तत्सम लोकं विटाळ मानत असत. म्हणूनच जे लोकं चांगले राहात असत. स्वच्छता पाळत असत. त्यांच्याबाबतीत विटाळ नव्हताच. यासाठीच मनुस्मृती लिहिल्या गेली.

विटाळ...... अस्वच्छतेवरुन व कामाच्या स्वरुपावरुन आलेला. लोकांचं आजचं म्हणणं की त्या वेळच्या लोकांचं म्हणणं की लोकांची अस्वच्छतेची कामं करु नये. म्हणूनच विटाळ. परंतु हे जरी खरं असलं तरी ती अस्वच्छतेची कामं करणं एखाद्या तरी घटकाला आवश्यक होतं. जर ती कामं त्या विशिष्ट घटकानं केली नसती तर कदाचीत अस्वच्छताच अस्वच्छता पसरली असती. शिवाय तेवढेच आजारही आणि आजाराच्या साथीही. उदाहरण द्यायचं झाल्यास एखाद्या गाईचं देवू. एखादी गाय जर एखाद्या व्यक्तीच्या घरी मरण पावली असती आणि तिला ओढत नेवून फेकणारी जात जगात नसती तर कदाचीत त्या गाईला तिथंच सडत राहावं लागलं असतं. तिच्या पार्थिव शरीराची दुर्गंधी परीसरात सुटली असती. शिवाय त्यातून आजार पसरलाच असता. त्यामुळंच ती अस्वच्छतेची जात तेवढीच महत्वाची होती. जेवढी स्वच्छतेची कामं करणारी जात महत्वाची होती. त्यामुळंच विटाळ मानायलाच नको होता. व्यतिरीक्त मनुस्मृती लिहून जगाला मनुस्मृतीतील जाचक नियमांच्या आधारे जगायला लावले. जे जगणे अस्वच्छतेची कामं करणा?यांसाठी व संपुर्ण स्त्रीवर्गासाठी जाचक स्वरुपाचे होते. मनुस्मृतीत स्वच्छता बाळगणा?या विशिष्ट वर्गासाठी वेगळे व अस्वच्छ राहणा?या विशिष्ट वर्गासाठी वेगळे नियम होते. शिक्षेच्या बाबतीतही भेदभाव केलेला होता. शिवाय अधिकार आणि स्वातंत्र्यही गोठवले होते.

काही लोकांनी विटाळाला अतिशय महत्वपुर्ण घटक मानून त्याचा साथीच्या आजाराशी सःबंध जोडला. त्याला अधिक प्राधान्य दिलं. परंतु हे जरी बरोबर असलं तरी विटाळ हा अतिशय महत्वाचा घटक नव्हताच आणि तो मानणे गरजेचे नव्हतेच. शिवाय आजाराशी विटाळाचा संबंध लावून लोकांनी एका विशिष्ट जातींना अस्पृश्य मानलं. तसंच रजस्व नावाच्या नैसर्गिक प्रवृत्तीलाही विटाळ मानून स्त्रियांच्याही स्वतंत्र्यपणे जगण्यावर मर्यादा आणल्या. त्यांचे समाजातील अधिकार नाकारले. त्यातच अस्पृश्यांचा सुर्योदयानंतरच्या काही तासाचा गावातील प्रवेश नाकारला. एकीकडे त्यांचा स्पर्श म्हणजेच आजाराचा शिरकाव मानलं. तर दुसरीकडे त्यांनी तयार केलेल्या वस्तू त्यांना चालल्या. याचाच अभ्यास बाबासाहेबांनी केला होता. त्यानंतर बाबासाहेबांनीच सांगीतलं की पिढीतील धंदे सोडा. ते धंदेच विटाळ टिकवतात. आपल्याला माणसाप्रमाणे जगू देत नाहीत. आपल्याला त्या धंद्यामुळेच अतुच्छतेचं जगणं सहन करावं लागतं. त्यांनी पिढीजात धंदे सोडायला लावले. जातीगत विटाळ मिटविण्यासाठी. परंतु जात मिटवली नाही. जी जात मिटवायला हवी होती. ज्या कामातून जात निर्माण झाली होती व जातीअंतर्गत विटाळही निर्माण झाला होता. जो विटाळ मनुस्मृती आणि भाला संग्राममधील काही जाचक नियमांनी निर्माण केला होता. जाती, विटाळ व भेदभावाच्या पैलूतूनच त्यांनी मनुस्मृती जाळली. कारण त्यात लिहिलेल्या काही अनैतिक गोष्टी. ज्या मनाला रुचत आणि पटत नव्हत्या. शिवाय त्या प्रकरणाचा खटला न्यायालयात गेला. ज्यात विटाळ, भेदभाव होता. प्रथम तो खटला खालच्या न्यायालयात चालला. त्यानंतर तिथं बाबासाहेबांना विजय प्राप्त झाला व तो विजय इतर लोकांना पटला नसल्यानं तो खटला उच्च न्यायालयातही चालला. ज्यात विटाळ वाईटच असा निकाल आला होता. तरीही आज काही लोकं विटाळाच्या नियमांचा उदोउदो करुन त्या संबंधित विटाळाचा संबंध साथीच्या आजाराशी लावतात. त्या अस्पृश्य शोषत असलेल्या व स्त्रियांचे हक्कं नाकारणा?या गोष्टी काही लोकं चांगल्या होत्या असे मानतात. म्हणतात की आजपर्यंत जो देश मनुस्मृतीच्या आधारावर चालला. चांगला चालला. ज्यानं राष्ट्र टिकवलं. त्यांचं म्हणणं असं की मनुस्मृती चांगली.

मनुस्मृती, विटाळ, भेदभाव स्त्रियांचे अधिकार नाकारणे. या गोष्टी चांगल्या होत्या की वाईट. हे म्हणणं नाही. प्रत्येकांचं मत याबाबतीत वेगवेगळं असू शकते. कारण सर्वच व्यक्तींना सर्वच गोष्टी चांगल्या वाटतीलच असं नाही. एखाद्याला एखादी गोष्ट जास्त आवडते तर तीच गोष्ट दुस?याला अजिबात आवडत नाही. तेच झालं मनुस्मृती म, विटाळ, भेदभाव व इतर गोष्टींबद्दलबद्दल. आज जेही लोकं त्या सर्व गोष्टीला चांगले म्हणत असतील. त्यांना त्या गोष्टी आवडत असेलच यात शंका नाही. त्याचं कारण म्हणजे त्यांना त्यातील जाचक नियमांची झळ पोहोचलेली नसेल. त्यामुळं त्यांनाच त्यातील नियमांबद्दल काही घेणं देणं नव्हतंच. परंतु ज्यांना त्यातील नियमांची झळ पोहोचली. त्यांना मनुस्मृती, विटाळ, भेदभाव, स्त्रियांचे अधिकार नाकारणे या गोष्टी तरी कशा आवडतील? समजा एखाद्याला कारल्याची भाजी आवडत नसेल तर तो व्यक्ती कारल्याच्या भाजीला कडूच म्हणेल व ज्या व्यक्तीला कारल्याची भाजी आवडत असेल, तो व्यक्ती आवडीनं कारल्याची भाजी कडू होवूनही खाईलच खाईल. तेच झालं बाबासाहेबांबद्दल. त्यांनी या सर्व गोष्टींचा अभ्यास केला. त्यांना त्यातील नियम अजिबात पटले नाहीत. म्हणूनच त्यांनी मनुस्मृतीचं दहन केलं आणि चवदार तळयाचा सत्याग्रहही. ही बाब नाकारता येत नाही. तसाच तो खटला न्यायालयात गेला व न्यायालयानंही त्यातील नियम सामान्य लोकांच्या जीवन जगण्यासाठी वाईट आहेत याची पडताळणी करुन वा गृहीत धरुन जी मनुस्मृती जाळण्याची कृती वा इतर कृती चवदार तळयाच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केल्या होत्या. त्या कृतींना योग्य ठरवत बाबासाहेबांच्या कृतींचं समर्थन केलं. त्यानंतर निकाल दिला की आजपासून अशा सर्वच कृत्यांवर कायमस्वरुपी बंदी लावण्यात येत आहे. त्यातूनच विटाळ, स्त्रियांचे अधिकार नाकारणे आणि भेदभावावर बंदी घालण्यात आली.

विटाळ व भेदभावाची पाश्वभुमी. समाजाला बाबासाहेब जागृत करीत होते. सांगत होते की पिढीजात धंदे सोडा. ते अस्वच्छतेचे धंदे आहेत व त्यापासूनच भेदभाव, विटाळाचे किडे वळवळतात. वाढतात. विटाळ ही कीडच. शेवटी काही लोकांना वाटले, विटाळ नष्ट व्हावा. त्यांनी पिढीजात धंदे सोडले. ज्यातून सामाजिक परीवर्तन झालं व विटाळ मिटला व त्याचा परिणाम हा झाला की तदन्तर समाजातील काही लोकांनी पिढीजात धंदे सोडले नाहीत. त्यांनाही समाजात सन्मानाचं स्थान मिळायला लागलं. आज विटाळ नाही. विटाळ कायमचा मिटला आहे असंही म्हणता येत नाही. तरीही समाजात काल ज्या घटकाला हीन समजलं जात होतं. त्या घटकाला आज समाजात मानाचं तसंच सन्मानाचं स्थान आहे. काल धंद्यावरुन नीच समजल्या अस्पृश्यांनाही आज उच्च जातीचे लोकं आपल्या बरोबरीनं जगण्याची परवानगी देतात. त्यांना हीन लेखत नाहीत. विटाळाच्या कालचक्रात काल मोठं घर बांधण्याची इच्छा ठेवणा?यांना काल मोठं घर बांधता येत नव्हतं. आज तेही मोठं घर बांधू शकतात. एकमेकांच्या विवाह समारंभात भेदभाव न बाळगता सहभागी होत असतात. काल उच्च शिक्षण शिकता येत नव्हतं. आज उच्च शिक्षण शिकता येतं. काल एका अस्पृश्यानं तपश्चर्या केली म्हणून त्याच्या कानात शिसं ओतलं. आज तशी गोष्ट घडत नाही व तसा अन्याय झाल्यास आज न्यायालयात दाद मागण्याची तरतूद उपलब्ध आहे. कोणीच कोणाला हीन लेखू शकत नाही. अत्याचार करु शकत नाही. कारण आज कायद्याचं राज्य आहे व कायद्याचं उल्लंघन आज तरी करता येणे शक्य नाही. हेही शक्य झालं बाबासाहेबांमुळं. तरीही काही ठिकाणी विटाळ वळवळतोच. भेदभावही वळवळतोच. काही ठिकाणी स्त्रियांचे अधिकारही नाकारले जातातच. हे सगळं घडत असतं जातीमुळे. काही ठिकाणी आजही विशिष्ट जातीला हीन समजलं जातं. विटाळ मानला जातो. जात सहजासहजी सांगता येत नाही. ती जाणीवपूर्वक जाणूनबुजून लपवून आपली दुसरीच उच्चभ्रू जात सांगीतली जाते. याला काय म्हणता येईल. भेदभाव आणि विटाळच ना. आज बाबासाहेब आंबेडकर देवच आहेत की ज्यांनी समाज सुधरवला. समाजातील विटाळ थोडाफार बदलवला. लोकांना खुल्या मनानं जगात प्रवास करता येत असतं. आपली जात लपवून का असेना, वावरता येत असतं. अन् तरीही यदाकदाचित जातीवर अन्याय झाल्यास न्यायालयात दादही मागता येत असतं.

Printed, Published And Owned By NAJAKAT SHOUKAT SAYYED. Printed At Vishwa Prakashan Printers ,Aurangabad -jalna Highway Road Badnapur Dist Jalna - 431202 (Maharashtra)).Published from Near Police Station Badnapur Tq.Badnapur Dist Jalna -431202 (Maharastra) Editor- PARVEEN NAJAKAT SAYYED* (*Responsible As Per PR&B Act 1867 And Other Indian Law Related To Newspaper) RNI.REGD.NO.MAHMAR/2013/51856 (124411).(Tital code MAHMAR43151) Contact Us: 9923307786,9421947786 Email:- gaavmat@gmail.com/najakat7@gmail.com

# शेर-ए-पंजाब, शाही इमाम मौ. उस्मान रहमानी लुधियानवी 26 जानेवारी रोजी परभणी दौऱ्यावर

प्रतिनिधी

जालना : देशाचे प्रसिद्ध तरुण आलिम-ए-दीन, शेर-ए-पंजाब, शाही इमाम, सदर-ए-मजलिस-ए-अहरार-ए-इस्लाम, मौलाना उस्मान रहमानी लुधियानवी यांचे 26 जानेवारी 2025, रविवारी परभणी येथे आगमन होणार

आहे. मौलाना उस्मान रहमानी लुधियानवी यांच्या आगमनानिमित्त अल-खैर फाउंडेशन, परभणीच्या देखरेखीखाली दोन विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

पहिला कार्यक्रम सकाळी 10 वाजता इफ्तिखार पार्क, धार रोड, परभणी येथे होईल. ही बैठक विशेषतः उलेमा, वकील, शिक्षक आणि इतर बुद्धिजीवींसाठी ठेवण्यात आली आहे. दुसरा कार्यक्रम साधी सभा स्वरूपात जुन्या ईदगाह मैदान, जिन्तूर रोड, परभणी येथे संध्याकाळी 7 वाजता आयोजित केला जाईल.

या भव्य जनसभेचा विषय वक्फ आणि लोकशाहीचे संरक्षण असा आहे. या जनसभेचे अध्यक्षपद मौलाना कलंदर खान नदवी (परभणी) भूषवतील. कार्यक्रमाची देखरेख मौलाना शेख शाहिद अशरफी (मोहत्तमिम, मदरसा बारकियातुस्सालिहात, परभणी) करतील. या कार्यक्रमात मौलाना उस्मान रहमानी यांचे महत्त्वपूर्ण भाषण होणार आहे. तसेच, स्थानिक वक्ते म्हणून काझी-ए-शरियत मुफ्ती मोहम्मद सईद अनवर कासमी (इमाम, मशीद-ए- इद्रुसियाह, परभणी) यांचेही भाषण होईल.

सदरील कार्यक्रमास जास्तीत जास्त मुस्लीम समाजातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मुफ्ती शेख तल्हा अशरफी, मुफ्ती शेख साजिद नदवी, आणि अल-खैर फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री माननीय श्री एकनाथ शिंदे साहेब यांनी नाथपंथी आथिर्क विकास महामंडळ स्थापन केल्या बद्दल नाथशक्ती संघटना नाथपंथी समाज संस्थापक अध्यक्ष गणेश धायडे कडून साहेबांना श्री गुरु गोरक्षनाथ महाराज मुर्ती भेट दिली यावेळी ठाणे शिवसेना जिल्हाप्रमुख विजय दादा गोरे, विर वडार सेना संस्थापक अध्यक्ष दिलीप जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते छायाचित्र किरण खानापुरे

# सोशल मिडीयापेक्षा वृत्तपत्रातील बातमींवर जास्त विश्वास-अ‍ॅड.अश्विनी धन्नावत

## मराठा महासंघ व पीसीएम जालनाच्यावतीने जाहीरात प्रतिनिधींचा सन्मान;प्रिंट मिडिया डेव्हलपमेंट 2025 चा पुरस्काराने नरेश कोरडे सन्मानित

जालना । प्रतिनिधी - कुणी काही सांगितले अथवा सोशल मिडीयावरील वृत्तांपेक्षा वृत्तपत्रांमध्ये छापून आलेल्या बातम्यांवर आमचा जास्त विश?वास असल्याचे प्रतिपादन अ‍ॅड. आश?विनी धननवत यांनी येथे केले.

मराठा महासंघ व पीसीएम जालनाच्यावतीने जाहीरात प्रतिनिधी व पत्रकारांचा सन्मान सोहळा रेल्वे स्टेशन जवळील कृष्णा प्लाझा येथे आयोजित करण्यात आला होता. त्या प्रसंगी अ‍ॅड. आश?विनी धननवत बोलत होत्या. यावेळी अ‍ॅड. भास्कर मगरे, प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे (पीसीएम) राज्य सरचिटणीस महेश जोशी, विजय सकलेचा, हिंदु महासभेचे धनसिंह सुर्यवंशी, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अशोक पडुळ, मराठा महासंघाचे अरविंद देशमुख, पीसीएमचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांचे अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलतांना अ‍ॅड. धननवत म्हणाल्या की, लोकशाहीतील महत्त्वाचा चौथा स्तंभ पत्रकार म्हणून आपण आहात आपल्यावर मोठी जबाबदारी आहे. कुणी सांगितले, किंवा सोशल मिडीयावर, व्हॉटस्अपवर देखील आम्ही विश्वास ठेवत नाही. यासंदर्भात त्यांनी एक व्हॉटस्अपवरील मॅसेजचे उदाहरण देत. वृत्तपत्रांवरील बातमींवर आम्हाला जास्त विश्वास असल्याचेही अ?ॅड. धननवत यांनी म्हटले.

जाहीरातींमुळे वृत्तपत्रे टिकली आहेत. फायनान्स हा सर्वात महत्त्वाचा भाग आहे आणि वृत्तपत्रात जाहीरात मिळवून देणारे प्रतिनिधी हे वृत्तपत्राचा कणा असल्याचेही त्या म्हणाल्या. विधी संसर्ग बालकावरील वृत्त छापतांना त्यांचे नाव, ठिकाण छापू नका, त्यांची ओळख पटेल असे वृत्त देऊ नका असा सल्ला देतांना असे वृत्त आल्यास अशा विधीसंसर्ग बालकांचे पुढील



आयुष्य उद्धव्स्त होऊ शकते याबाबतीत काळजी घेण्याचा सल्लाही पत्रकारांना यावेळी अ?ॅड. धननवत यांनी दिला.

अ?ॅड. भास्कर मगरे म्हणाले की, आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सहा जानेवारी रोजीच दर्पण वृत्तपत्र काढले होते तेव्हा पासून मराठी पत्रकारिता पुढे आली आहे. दर्पण दिनाच्या सर्व पत्रकारांना त्यांनी शुभेच्छा दिल्या ते म्हणाले की, कालातरांने मराठी पत्रकारितेला सदृढ, समृद्ध करण्याचे कार्य आपल्या सारख्या पत्रकारांनी केले आहे. समाजातील विविध प्रश?न मांडण्याचे काम पत्रकार करीत असतात. तळागाळातील प्रश?न ज्यात आर्थिक, सामाजिक, विज्ञानाचे अशा सर्वच प्रश?नांवर जनजागृती आणि उलगडा करण्याचे काम पत्रकार करत असतात दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा सत्कार सोहळा पाहण्यास मी येथे उपस्थित झालो असल्याचेही अ?ॅड. भास्कर मगरे यावेळी म्हणाले.

विजयकुमार सकलेचा म्हणाले की, मागील आठवड्यात प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्या वतीने पत्रकारांचा सन्मानाचा मोठा कार्यक्रम सहा जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. मात्र, या कार्यक्रमात जाहिरात प्रतिनिधींचा सत्कार झाला नसल्याबाबत खेद व्यक्त केला. तसेच पुन्हा पीसीएमचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके व मराठा महासंघाचे अरविंद देशमुख यांनी जाहीरात प्रतिनिधींच्या सत्कारांचा योग घडवून आणला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. वृत्तपत्रात वितरण, संपादकीय विभाग, जाहीरातदार, बातमीदार आणि डीटीपी विभाग हे पाच प्रमुख घटक आहेत थोडक्यात लोकशाहीतील चौथा खांब असलेल्या वृत्तपत्रांसाठी हे पाच खांब महत्त्वाचे असल्याचे सांगून उपस्थित पत्रकारांना विजयकुमार सकलेचा यांनी शुभेच्छा दिल्या.



जालना -कुंभाराचा आवा(वान)लुटण्याचा कार्यक्रम सोमवंशी सहस्त्राअर्जुन महिला मंडळ क्षत्रिय समाजाच्या महिला मंडळातर्फे मकर संक्रांति निमित्त निमित्त घेण्यात आला व ही शोभायात्रा वाजत गाजत आनंदी स्वामी मंदिरापासून काढण्यात आली व भैरवनाथ मंदिर येथे विसर्जन करण्यात आले क्षत्रिय समाजाच्या महिला मंडळांनी हळदी कुंकवाचा कार्यक्रम ठेवून कुंभाराची मडकी चुली रांजण हे वाण वाटण्यात आले .(छायाचित्र किरण खानापुरे) सौ. स्मिता खेरुडकर ,जयश्री चंदन ,चंदा नाकाडे , कविता पातेकर ,वर्षा कुदाळे ,सुनिता क्षत्रिय ,अनिता खोडवे , शितल विष्णु , अनिता खेरुडकर ,मेघना बोबडे , प्रिती चंदन , सोनाली खेरुडकर , नंदा खानापूरे , ज्योति शेटे ,अंबिका नांदगावक, छाया कल्याण ,गिता नाकाडे ,लता नांदगावकर

# हिरकणी पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

जालना (प्रतिनिधी) : सामाजिक क्षेत्रात काम करणा?ऱ्या महिलांचे कौतुक होण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून जालना येथील हिरकणी ग्रुप आणि उज्वल बहुउद्देशील सेवाभावी संस्थेच्या वतीने हिरकणी पुरस्कार देण्यात येतो. या वर्षी देखील या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असून त्यासाठी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या आणि सामाजिक क्षेत्रात योगदान देणा?ऱ्या पात्र महिलांनी हिरकणी पुरस्कारासाठी अर्ज करावेत असे आवाहन संस्थेच्या अध्यक्ष सौ. करुणाताई मोरे आणि सामाजिक कार्यकर्त्या सौ. रसना देहेडकर यांनी आहे.

महिलांनी केलेल्या कर्तबगारीचे कौतुक व्हावे आणि त्यांना काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी दर वर्षी हिरकणी पुरस्कारासाठी कर्तबगार महिलांची निवड केली जाते. त्यामुळे विविध क्षेत्रात कार्य करणा?ऱ्या आणि समाजासाठी भरीव योगदान देणा?ऱ्या महिला या पुरस्कारातही अर्ज करू शकतात. या पुरस्कारासाठी कोणत्याही प्रकारची नोंदणी फी नाही. किंवा या पुरस्कारासाठी कोणतेही शुल्क भरण्याची गरज नाही. केलेल्या कामाचा प्रस्ताव परिपूर्ण पाठवावा. अर्जानुसार केलेल्या कामाचे मुल्याकंन करून पुरस्कार निवड समिती पात्र महिलेची पुरस्कारासाठी निवड करेल. निवड समितीचा निणऱ्य हा अंतिम राहील.